# ☀ समता सैनिक दल ☀

(स्वयंसेवी सामाजिक संघटन)

समता सैनिक दल:-

�घटना.( संविधान)�

�कलम:-१) नाव आणि संघटना.

(अ) संघटनेचे नाव समता सैनिक दल राहील. ज्याला यापुढे एस.एस.डी( S.S.D) म्हणुन संबोधले जाईल.

(ब) समता सैनिक दल हे भारतीय अनुसूचित जाती संघाशी ( ऑल इंडिया शेड्युल कास्ट फेडरेशन ( S.C.F) शी जोडले जाईल.

परंतु,

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३० सप्टेंबर १९५६ साली, दिल्लीला त्यांच्या राहत्या घरी सदर पक्ष बरखास्त करून सर्व भारतीयांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा राजकीय पक्ष दिला. ऐव्हढेच नव्हे तर सर्व भारतीयांसाठी ऐक खुले पत्र लिहले व त्यात असे स्पष्ट नमूद केले की भारतिय राज्यघटना खऱ्याखुऱ्या अर्थाने राबवण्यासाठी माझा RPI पक्ष कार्य करेल, त्यासाठी सर्वांनी माझ्या पक्षात सामील व्हावे. त्याप्रमाणेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाशी समता सैनिक दल संलग्न राहील.

�कलम:-२ ध्येय व उद्दिष्टे

(अ) वंश,धर्म,जात,लिंग आणि वर्ग इत्यादीवर आधारलेली विषमता नष्ट करण्यास आणि सर्वासाठी स्वतंत्रता आणि समानता या मुल्यांवर आधारित समाजाची निर्मिती करण्याकरिता भारतातील सर्व घटकांना संघर्षासाठी एकत्र आणण्यास झटणे हे समता सैनिक दलाचे ध्येेय आहे.

(ब) वरिल ध्येये पूर्तिस्तव...

१) समता सैनिक दल सर्व भारतीय युवकांना आपल्या ध्वजाखाली एकत्रित आणेल व संघटित करील.

२) त्यांच्या मनात स्वाभिमान,स्वांलबन आणि स्वबलिदानाची भावना विकसित करण्याकरिता सामाजिक, सांस्कृतिक व इतर कार्यक्रम भारतीय लोकांमध्ये विशेषत: युवकांमध्ये घडवुन आणण्यास समता सैनिक दल प्रोत्साहन देईल.

३) समता सैनिक दल त्याचे ध्येेय व उद्धेशास पोषक कार्य करणाऱ्या संघटना आणि चळवळीस सहकार्य देईल.

�कलम :-३ सभासदत्व

ज्यांना वरिल ध्येेय व उद्धिष्टे मान्य आहेत अशा १८ वर्षावरील कोणतीही भारतिय व्यक्ती वार्षीक वर्गणी १० रुपये भरून समता सैनिक दलाचा सदस्य होऊ शकतो.

कलम :-४ प्रशिक्षण :-

समता सैनिक दलाचे प्रशिक्षण बौद्धिक, शारिरीक व लष्करी अशा तीन प्रकारचे राहील.

2. प्रशिक्षण शिबिरे, समविचारी लोकांची चर्चा सत्रे, खास कार्यक्रमानिमित्ताने काही व्यक्तीच्या सभा, वर्ग, भाषणे, वादविवाद, परिसंवाद, वाचनालये वगैरे आणि वेळोवेळी योग्य वाटणाऱ्या अशा सभा इत्यादी कार्यक्रमाचे समता सैनिक दल आयोजन करिल.

कलम :- ५ रचना:-

१२ सैनिक = १ तुकडी

२४ सैनिक = १ प्लाटुन

९६ सैनिक (४प्लाटून) = १ कंपनी

३८४ सैनिक = बटालियन

११५२ सैनिक= १ रेजिमेंट

कलम :- ६ दलाच्या सभा:-

समता सैनिक दलाची सभा दर ६ महिन्यातून कमीतकमी एकदा तरी होईल. सभेचे कामकाज आणि नियमावली घटनेला सुसंगत अशाच पद्धतीने वेळोवेळी करण्यात येईल.

कलम:- ७ दैनिक वेळापत्रक:-

सोमवार - नीती तत्त्वे( Moral ) ( नीती तत्वांची शिकवण म्हणजे धम्म )

मंगळवार - खेळ व शारीरीक कवायत

बुधवार - लष्करी कवायत(Millitary Drill)

गुरूवार- खेळ व शारिरीक प्रशिक्षण

शुक्रवार- प्रथमोपचार(First AID)

शनिवार- लष्करी कवायत

रविवार- राजकीय व सामाजिक चर्चा

कलम :- ८ शिस्त:-

जर एखादा सैनिक किंवा दलाचा अधिकारी धुम्रपान व मद्यपान करताना किंवा वरिष्ठांची अवज्ञा करताना किंवा दुसरी एखादी खोडी करताना आढळल्यास त्याला ताकीद (Warning) देण्यात येईल.

जर ह्यांनंतरही त्यांच्या वागणुकीत सुधारणा न झाल्यास त्याचा गणवेष व पद काढुन टाकण्यात येवून त्याला दलातून काढून टाकण्यात येईल.

कलम :- ९ गणवेष:-

समता सैनिक दलाच्या सैनिकाचा गणवेष हा खाकी हॉफ पँट( सुधारित=फुल पँट) खाकी हॉफ शर्ट ( सफेद शर्ट), घडीची टोपी,कँनव्हासचा ब्राऊन जोडा किंवा पठ्ठाणी सँडल आणि मोजे व साडेचार फुटाची काठी(दंडा) असा राहील.

कलम :- १० दलाचा निधी:-

शेड्युल कास्ट फेडरेशनने नेमलेला पर्यवेक्षक ( सुपरवाईझर)

[ टिप:- ३० स्पटेंबर १९५६ ला शेड्युल कास्ट फेडरेशन बंद करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी RPI हा पक्ष दिल्याने त्यामध्ये RPI चा पर्यवेक्षक असा बदल.]

आणि दलाचा सेनापती यांच्या अनुमतीने दलाचा सर्व निधी एका बँकेत किंवा अनेक बँकातून समता सैनिक दलाच्या नावाने ठेवण्यात येईल.ह्या निधीसंबंधीचे सर्व व्यवहार सेनापती व दलाचा मुख्य सचिव यांच्या नावाने चालवतील.

कलम ११ :- ध्वज:-

समता सैनिक दलाचा ध्वज चार फूट लांब व अडिच फूट रूंद राहील.ध्वजाचा संपुर्ण भाग गडद निळ्या रंगाचा राहिल आणि वरच्या बाजूला डाव्या कोपऱ्यात पांढऱ्या रंगामध्ये नोकदार ११ तारे राहतील.ध्वजाच्या मध्य भागात पांढऱ्या रंगामध्ये सूर्य राहील.त्यामध्ये मोढ्या आकाराने निळ्या रंगात RPI ( SCF बरखास्त झाल्याने नविन पक्षाचे नाव येईल) ही अक्षरे राहतील. ध्वजाच्या खालच्या बाजुला उजव्या कोपऱ्यातमध्ये पांढऱ्या रंगात S.S.D ही अक्षरे राहतील. स्वतंत्रता, समानता आणि बंधुता तसेच ध्येय प्राप्तीसाठी लढा ही या ध्वजाची ओळख आहे.

▯ सैनिकाची प्रतिज्ञा▯

मी समता सैनिक दलात प्रवेश करणारा रिपब्लिकन भारताचा घटक (पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीचा घटक)

माझ्या समाजाला जुलूम, शोषण, पिळवणूक व गुलामगिरी ह्यापासून मुक्त करण्याच्या उदात्त कार्यासाठी सन्मानीय, शूर, शिस्तबद्ध आणि निर्धारी लढवय्या होण्याची प्रतिज्ञापूर्वक शपथ घेतो.

माझ्या समाजातील लोकांच्या न्याय व मानवी हक्काच्या रक्षणासाठी पुढे धावून जाण्यास समता सैनिक दलाच्या आज्ञा पालनार्थ मी सदैव तयार राहीन.

कमकुवतपणा, भित्रेपणा किंवा वाईट उद्देश यामुळे जर माझ्या हातून ह्या प्रतिज्ञेचा भंग झाल्यास आणि माझ्या लोकांच्या हितसंबंधात मी फसवणूक केल्यास, विश्वासघात केल्यास, दलाकडून दिली जाणारी शिक्षा पूर्णपणे भोगण्यास मी तयार असेन.

(टीप: वरील मराठीतील प्रतिज्ञा हि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1927 ला जन्मास घातलेल्या समता सैनिक दलाची असून ती मराठीत स्वैर भाषांतरित केलेली आहे. अनुवादाचा प्रश्न उद्भवल्यास ती मूळत: इंग्रजीत DBAWS Vol. 17, Part 3, Page 566 मध्ये वाचावी आणि तीच ग्राह्य धरावी आणि 1956 च्या बुद्धधम्म धम्मदीक्षेनंतर आणि SCF ला बरखास्त करून बाबासाहेबांनी RPI ला जन्मास घातल्यामुळे 'शेड्युल्ड कास्ट कम्युनिटी' ऐवजी त्यात 'रिपब्लिकन भारतीय' एवढा बदल क्रमप्राप्त आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित लेखन व भाषणे, खंड 17 भाग 3 पान नं.566.

संकलन:-

समता सैनिक दल

H.Q:- दिक्षाभूमी, नागपूर

Join S.S.D

▯8655582188

▯9324127909

www.ssdindia.org

(रिपब्लिकन चळवळीच्या पुनर्बांधणी साठी कटीबद्द)